MHSO190018222018

| | |
|---|---|
| फिर्याद दाखल दिनांक | : २७/११/२०१८ |
| फिर्याद नोंदणी दिनांक | : २८/११/२०१८ |
| फिर्याद निकाली दिनांक | : ३०/०६/२०२६ |
| कालावधी | : वर्ष म दि<br>०७ ०७ ०३ |

# प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, ता. मोहोळ, जि. सोलापूर

## (पिठासीन अधिकारी : एस.व्ही.मुंडे)

**नि. फौजदारी खटला क्र.२५६/२०१८**

**नि.क्र.**

**फॉर्म– अ**

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(१) प्रमाणे)**

| | | |
|---|---|---|
| | **गु.र.क्र.४७१/२०१८,** भारतीय दंड विधानाचे कलम १४७, १४८, १४९, ३२६, ३२३, ५०४ आणि ५०६ अन्वये, पोलीस ठाणे मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर. | |
| **अभियोगपक्ष** | : | महाराष्ट्र सरकार मार्फत पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर. |
| **प्रतिनिधीत्व** | : | अभियोगपक्षातर्फे विद्वान सरकारी अभियोक्ता श्री.डी.पी.गाढवे |
| **आरोपी** | १ | ज्ञानेश्वर अर्जुन सोनटक्के,<br>वय – ३३ वर्षे, धंदा – नोकरी, |
| | २ | चंद्रकांत अरुण गुंड,<br>वय – ३३ वर्षे, धंदा – शेती/पोलीस पाटील, |

| | | |
|---|---|---|
| | ३ | शरद अरुण गुंड,<br>वय – २७ वर्षे, धंदा – शेती, |
| | ४ | प्रविण सोमा टेकाळे,<br>वय – २८ वर्षे, धंदा – शेती, |
| | ५ | लक्ष्मण अरुण गुंड,<br>वय – ३२ वर्षे, धंदा – शेती,<br>सर्व रा.सावळेश्वर, ता.मोहोळ, जि.सोलापूर. |
| **प्रतिनिधीत्व** | : | आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. एच.डी.टेकाळे |

## फॉर्म– ब

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(२) प्रमाणे)**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २६/०६/२०१८ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | २६/०६/२०१८ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | २७/११/२०१८ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | ०४/०६/२०२४ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ०१/११/२०२५ |
| ज्या दिवशी निकाल राखून ठेवला तो दिनांक | ३०/०६/२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ३०/०६/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | निरंक |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेचा दिनांक | जमीन दिल्याचा दिनांक | गुन्हा | निर्दोष/दोषी | शिक्षा ठोठावली | फौ.प्र.सं.चे कलम ४२८ च्या उद्देशाने अटकेत ठेवण्याचा |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ज्ञानेश्वर अर्जुन सोनटक्के | ०५/०७/२०१८ | ०५/०७/२०१८ | भा.दं.वि.चे कलम १४७, १४८, १४९, ३२६, ३२३, ५०४, ५०६ व म.पो.का. कलम १३५ अन्वये | निर्दोष | -- | -- |
| २. | चंद्रकांत अरुण गुंड | ०३/०७/२०१८ | ०३/०७/२०१८ | | | --- | --- |
| ३. | शरद अरुण गुंड | २९/०६/२०१८ | २९/०६/२०१८ | | | -- | -- |
| ४. | प्रविण सोमा टेकाळे | २७/०६/२०१८ | २८/०६/२०१८ | | | -- | -- |
| ५ | लक्ष्मण अरुण गुंड | २७/०६/२०१८ | २८/०६/२०१८ | | | -- | -- |

## न्या य नि र्ण य
## (अधिघोषीत दिनांक ३०/०६/२०२६)

आरोपींविरूध्द भारतीय दंड विधानाचे कलम १४७, १४८, १४९, ३२६, ३२३, ५०४, ५०६ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये शिक्षाधीन अपराधासाठी संपरीक्षा घेण्यात आली. (यापुढे संक्षेपासाठी भा.दं.वि. संबोधण्यात येते).

**अभियोगपक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :-**

**०२.** दि.२६/०६/२०१८ रोजी फिर्यादी नेताजी प्रकाश गावडे यांनी मोहोळ पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली की, सदर दिवशी रात्री ९.१० वाजणेच्या सुमारास तो व शशिकांत गावडे असे दोघे मिळून चहा पिण्यासाठी म्हणुन सावळेश्वर येथील टोल नाक्यावर येथे गेले होते. त्याठिकाणी आरोपी क्र.१ ते ५ हे चारचाकी मधुन आले व त्यांना विनाकारण शिवीगाळी करु लागले. त्यावेळी फिर्यादी व शशिकांत यांनी त्यांना विनाकारण शिवीगाळी करु नका असे म्हणाले असता त्यापैकी आरोपी क्र.१ ज्ञानेश्वर याने गाडीतून रॉड काढुन व आरोपी क्र.२ चंद्रकांत याने खाली पडलेली सिमेंट वीट घेऊन रॉडने व विटाने मारहाण करण्यास

सुरुवात केली. त्यामुळे त्या दोघांना डोक्याला जबर मार लागून ते दोघे जखमी झाले. त्यावेळी आरोपी क्र.३ ते ५ यांनी देखील त्यांना शिवीगाळी केली व लाथाबुक्यांनी मारहाण केली. त्याठिकाणी जमलेल्या लोकांनी त्यांची भांडणे सोडवली. आरोपी ज्या गाडीतून आले होते त्या गाडीचा क्र.एमएच–१३/बीके–९२९२ असा होता. म्हणुन फिर्यादीने आरोपींविरुध्द प्रस्तुतची फिर्याद मोहोळ पोलीस ठाणे येथे दाखल केली.

**०३.** सदर फिर्यादवरून पोलीस ठाणे, मोहोळ येथे गुन्हा नोंदणी क्रमांक ४७१/२०१८, भा.दं.वि.चे कलम १४७, १४८, १४९, ३२६, ३२३, ५०४, ५०६ व महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. तपासादरम्यान तपासीक अंमलदार सहा.पो.नि./विक्रांत बोधे यांनी घटनास्थळ पंचनामा केला. साक्षीदारांचे जबाब नोंदवुन जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. गुन्ह्यात वापरलेली लोखंडी रॉड, सिमेंटची विट, चारचाकी वाहन व कपडे इ. जप्ती पंचनामा करुन जप्त केले व आरोपींविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** या प्रकरणात, माझ्या पूर्वाधिकारी न्यायालयाने आरोपींविरुद्ध भा.दं.वि. कलम १४३, १४८, १४९, ३२६, ३२३, ५०४, ५०६ व महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ अंतर्गत दोषारोप (नि.क्र.३१) प्रमाणे निश्चित केला. दोषारोप त्यांच्या भाषेत समजावून सांगितल्यावर, त्यांनी आपल्यावरील आरोप नाकारले व संपरीक्षा स्वीकारण्याची तयारी दर्शविली. आरोपीविरुद्ध कलम ३१३(१)(ब) फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत निवेदन नि.५३ ते ५७ प्रमाणे नोंदवण्यात आले.

**०५.** अभियोगपक्षाची एकंदर हकीकत, अभिलेखावरील पुरावा व आरोपीचा बचाव विचारात घेता, खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्या प्रत्येक मुद्यांचा निष्कर्ष मी त्यावरील कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र | विचारार्थ बाबी | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.२६/०६/२०१८ रोजी रात्री ०९.१० वाजेच्या सुमारास सावळेश्वर टोल नाका, सावळेश्वर, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे प्रस्तुत आरोपींनी त्यांचे समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी गैरकायद्याची मंडळी जमा केली व त्या जमावाचे सदस्य झाले हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही. |
| २. | उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी, प्रस्तुत आरोपींनी बेकायदेशीर जमावामध्ये सामील होऊन त्या जमावाचे समान उद्दीष्ट साध्य करण्यासाठी लोखंडी रॉड व सिमेंटची विट या सारख्या प्राणघातक शस्त्रांनिशी दंगा केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| ३. | उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी, प्रस्तुत आरोपींनी जमविलेल्या सदर बेकायदेशीर जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याच्या हेतुने किवा वैयक्तिकरित्या, लोखंडी रॉड व सिमेंटची विट यासारख्या प्राणघातक शस्त्राने फिर्यादी व साक्षीदार शशिकांत गावडे यांना मारहण करुन इच्छापुर्वक गंभीर दुखापत पोहोचवली हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| ४. | उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी, प्रस्तुत आरोपींनी जमविलेल्या सदर बेकायदेशीर जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याच्या हेतुने किवा वैयक्तिकरित्या, फिर्यादी व साक्षीदार यांना हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत पोहोचवली हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही. |
| ५. | उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी, प्रस्तुत आरोपींनी जमविलेल्या सदर बेकायदेशीर जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याच्या हेतुने किवा वैयक्तिकरित्या, फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळी करुन जाणीवपर्वक अपमानित केले व सदर कृत्यामुळे त्यांच्याकडुन | नाही. |

सार्वजनिक शांततेचा भंग होईल किंवा एखादा अपराध घडण्याची शक्यता असल्याची जाणीव असुन देखील तसे करण्यास प्रक्षोभित केले हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय?

| | | |
|---|---|---|
| ६. | उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी, प्रस्तुत आरोपींनी जमविलेल्या सदर बेकायदेशीर जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याच्या हेतुने किवा वैयक्तिकरित्या, फिर्यादी व साक्षीदार यांना दमदाटी करुन फौजदारी धाकदडपशा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| ७. | उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी, प्रस्तुत आरोपींनी जमविलेल्या सदर बेकायदेशीर जमावाचे उद्दीष्ट साध्य करण्याच्या हेतुने किवा वैयक्तिकरित्या, मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्या आदेशाचा भंग केला हे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| ८. | काय आदेश ? | आरोपींना निर्दोष मुक्त केले. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र.०१ व ०७ करीता</u> :–**

**०६.** प्रस्तुत प्रकरणातील मुद्दे हे एकाच घटना–साखळीतील भाग असल्याने तथ्यांची अनावश्यक पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे संयुक्त विवेचन करण्यात आले आहे.

**०७.** अभियोग पक्षाच्या हकीकतीनुसार दि.२६/०६/२०१८ रोजी रात्री ९.१० वाजेच्या सुमारास आरोपींनी विनाकारण फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळी व दमदाटी करुन लोखंडी रॉड व सिमेंटची विट यासारख्या प्राणघातक शस्त्राने मारहाण करुन गंभीर दुखापत पोहोचवली. त्यामुळे अभियोग पक्षाने नोंदवलेला पुरावा व त्याअनुषंगाने दाखल केलेला कागदोपत्री पुरावा यांचे अवलोकन करणे आवश्यक ठरते.

०८. करीता जखमी साक्षीदार शशिकांत सुरेश गावडे (सा.क्र.०१), प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सिताराम विश्वनाथ लांडगे (सा.क्र.०२), कैलास गोरख टेकाळे (सा.क्र.०३) आणि फिर्यादी साक्षीदार नेताजी प्रकाश गावडे (सा.क्र.०४) यांचे सरतपासाचे एकत्रीतपणे अवलोकन करता त्यांनी त्यांच्या सरतपासात घटना कधी व काय घडली होती हे त्यांना माहित नसल्याचे सांगून पोलीसांनी त्यांच्याकडे कोणतीही चौकशी केली नसल्याचे सांगितले आहे. फिर्यादी साक्षीदाराने त्याने दिलेली तक्रारमधील त्याची सही ओळखली आहे परंतु त्यातील मजकुर त्याला माहिती नसल्याचे सांगितले आहे. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्यामुळे अभियोग पक्षातर्फे सदर साक्षीदारांचा विस्तृत उलट तपास नोंदवण्यात आला. त्यात त्यांनी अभियोगपक्षास लाभदायी ठरेल असे कोणतेही विधान केलेले नाहीत.

०९. अभियोगपक्षाने आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना लोखंडी रॉड व सिमेंटची विट यासारख्या हत्याराने मारहाण करणे तसेच शिवीगाळी करणे व दमदाटी करणे अशा प्रकारचे आरोप सिध्द करण्यासाठी फिर्यादी, जखमी साक्षीदार व इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचीच साक्ष अभिलेखावर आणली आहे. इतर कोणताही पंच साक्षीदार, तपासिक अंमलदार अथवा पूरक साक्षीदार सादर करण्यात आलेला नाही. त्यामुळे संपूर्ण प्रकरणात फिर्यादी, जखमी साक्षीदार व प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांची साक्ष ही अभियोगपक्षासाठी मुख्य आधार ठरते.

१०. सर्व साक्षीदारांनी त्यांच्या मौखिक साक्षेत घटनेबाबत पूर्णपणे अनभिज्ञता व्यक्त केली आहे. चारही साक्षीदारांनी त्यांना घटनेबाबत काहीही माहित नसल्याचे त्यांनी स्पष्टपणे कबूल केले आहे. फिर्यादवर फिर्यादीची सही असली व ती त्याने मान्य केली असली तरी त्या फिर्यादीतील मजकूर त्यांना माहित नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे त्यांच्या स्वतःच्या फिर्यादी व न्यायालयातील साक्ष यांच्यात मूलभूत विसंगती निर्माण होते.

११. अभियोगपक्षाने फिर्यादी व जखमी साक्षीदार यांना फितूर साक्षीदार घोषित

करून त्यांचा विस्तृत उलटतपास केला असता देखील त्यांच्या कडून अभियोगास पूरक ठरेल असे कोणतेही विधान प्राप्त झालेले नाही. उलट, फिर्यादीने आरोपींसोबत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे स्पष्ट मान्य केले आहे. ही कबुली त्यांच्या साक्षीच्या विश्वासार्हतेस धक्का देणारी आहे आणि घटनाक्रमाबाबत त्यांची भूमिका डळमळीत असल्याचे दर्शविते. तसेच त्यांच्या साक्षीतून आरोपींनी लोखंडी रॉड व सिमेंटची विट याने मारहाण करुन गंभीर दुखापत करणे किंवा शिवीगाळी करुन धमकी देणे यासंबंधी एकही ठोस व सुसंगत विवरण प्राप्त होत नाही.

**१२.** प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीच्या साक्षीव्यतिरिक्त जखमी साक्षीदार व दोन प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांची साक्ष नोंदवली आहे. परंतु, त्यांनी देखील अभियोग पक्षास पुरक असा पुरावा नोंदवलेला नाही. तसेच अभियोग पक्षाने वैद्यकीय पुरावा किंवा वस्तुनिष्ठ पुरावा देखील उपलब्ध करुन दिलेला नाही. फौजदारी न्यायव्यवस्थेचा मूलभूत सिद्धांत असा आहे की अभियोगपक्षाने आरोप "संशयाच्या पलीकडे" सिद्ध करणे आवश्यक असते. अस्थिर, विसंगत, आणि अविश्वसनीय साक्षीच्या आधारे आरोपीला दोषी ठरविणे कायदेशीरदृष्ट्या मान्य होऊ शकत नाही. या प्रकरणात अभियोगपक्षाचे सर्व आरोप फक्त अनुमानावर राहतात, तर आरोपींविरुद्ध गुन्हा सिद्ध करणारा कोणताही सबळ पुरावा अस्तित्वात नाही.

**१३.** वरील सर्व परिस्थितींचा एकत्रित विचार करता असे दिसून येते की, अभियोगपक्ष प्रस्तुत प्रकरणातील सर्व आरोप सिद्ध करण्यात स्पष्टपणे अपयशी ठरला आहे. पुराव्याचा पूर्ण अभाव आणि फिर्यादी व जखमी साक्षीदार यांची प्रतिकूल साक्ष यामुळे आरोपीस शंका लाभ देणे बंधनकारक ठरते. त्यामुळे मुद्दा क्रमांक ०१ ते ०७ चे उत्तर नकारार्थी स्वरुपात नोंदवण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र.०८ करीता</u> :–**

**१४.** आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांना विनाकारण शिवीगाळी व दमदाटी करुन

लोखंडी रॉड व सिमेंटची विट यासारख्या प्राणघातक शस्त्राने मारहाण करुन गंभीर दुखापत पोहोचवल्याचे व त्याअनुषंगाने आरोपींनी भा.दं.वि. कलम १४३, १४८, १४९, ३२६, ३२३, ५०४, ५०६ व महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ प्रमाणे गुन्हा केल्याचे अभियोग पक्ष सिध्द करु शकलेला नाही. त्यामुळे, प्रस्तुत आरोपी हे सदर दोषारोपातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. तसेच फिर्यादीने स्वतः हजर होऊन प्रकरण तडजोडीने मिटल्याचे नमुद केले असल्याने व त्यांना प्रस्तुत न्यायनिर्णयाची कल्पना असल्याने त्यांना न्यायनिर्णयाची प्रत पाठविण्याची आवश्यकता दिसून येत नाही. सबब, विचारार्थ बाब क्र.८ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**१.** आरोपी क्र.१ ज्ञानेश्वर अर्जुन सोनटक्के, आरोपी क्र.२ चंद्रकांत अरुण गुंड, आरोपी क्र.३ शरद अरुण गुंड, आरोपी क्र.४ प्रविण सोमा टेकाळे आणि आरोपी क्र.५ लक्ष्मण अरुण गुंड यांची फौजदारी प्रक्रिया संहिता २४८(१) नुसार भारतीय दंड विधानाचे कलम १४३, १४८, १४९, ३२६, ३२३, ५०४, ५०६ व महाराष्ट्र पोलीस कायदा, १९५१ चे कलम १३५ अन्वये शिक्षाधीन गुन्हा केल्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२.** आरोपींनी यापुर्वी दाखल केलेले जामीन कदबे रद्द करण्यात येतात.

**३.** जप्त मुद्देमाल, एक लोखंडी रॉड, एक सिमेंटची विट व कपडे या मुल्यहीन असल्याने अपील कालावधीनंतर नाश करण्यात यावा.

**४.** तसेच जप्त मुद्देमाल एक हुंडाई कंपनीची पांढ–या रंगाची कार तिचा क्र.एमएच–१३/बीके–९२९२ चा ताबा मुळ मालकास योग्य त्या पडताळणीनंतर अगर यापुर्वी दिलेला नसल्यास देण्यात यावा.

**५.** आरोपींनी प्रस्तुत न्यायनिर्णयाविरूध्द अपील झाल्यास अपीलीय न्यायालयासमोर हजर

राहणेबाबत कलम ४३७(अ) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या पुर्ततेकरीता आरोपींनी प्रत्येकी रक्कम रु.२५,०००/– चा वैयक्तीक जातमुचलका दाखल करावा जो पुढील सहा महिन्याकरीता अस्तित्वात राहतील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात अधिघोषीत करण्यात आला).

SANTOSH VISHNU MUNDE

Digitally signed by SANTOSH VISHNU MUNDE
Date: 2026.06.30 15:40:29 +0200

**दिनांक :–** ३०/०६/२०२६

**(एस. व्ही. मुंडे),**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, मोहोळ.

# –: परिशिष्ट :–

**फॉर्म – क (फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४(३) प्रमाणे)**

## फिर्यादी/बचावपक्ष/न्यायालय/साक्षीदारांची यादी

अ) अभियोपक्षाच्या साक्षीदारांची यादी.

| अ.क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| १. | शशिकांत सुरेश गावडे (नि.क्र.४१) | जखमी साक्षीदार |
| २. | सिताराम विश्वनाथ लांडगे (नि.क्र.४७) | साक्षीदार |
| ३. | कैलास गोरख टेकाळे (नि.क्र.४८) | साक्षीदार |
| ४. | नेताजी प्रकाश गावडे (नि.क्र.५०) | फिर्यादी |

ब) बचाव पक्षाच्या साक्षीदारांची यादी.

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| | निरंक | लागू नाही. |

क) न्यायालयाच्या साक्षीदारांची यादी.

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| | निरंक | लागू नाही. |

## फिर्यादी/बचावपक्ष/न्यायालय/ निशाणी क्रमांक यादी

अ) अभियोगपक्ष निशाणी क्रमांक यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | -- | फिर्याद / जबाब |
| २. | -- | घटनास्थळ पंचनामा |

| | | |
|---|---|---|
| ३. | -- | जप्ती पंचनामा |
| ४. | -- | वैद्यकीय प्रमाणपत्र |

ब) बचाव पक्षाने मान्य केलेल्या दस्ताऐवाजची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | लागू नाही. |

क) बचाव पक्ष निशाणी क्रमांक यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | लागू नाही. |

ड) न्यायालय निशाणी क्रमांक यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र. ३१ | दोषारोप |
| २. | निशाणी क्र.३२ ते ३६ | आरोपींचे प्रतिकथन |

इ) मुद्देमाल वस्तु.

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | लागू नाही. |

SANTOSH VISHNU MUNDE

Digitally signed by SANTOSH VISHNU MUNDE
Date: 2026.06.30 15:40:36 +0200

**दिनांक :-** ३०/०६/२०२६ **(एस. व्ही. मुंडे),**

न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, मोहोळ.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file of Judgment / Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Ajay S. Bakale - III |
| Court | : | J.M.F.C, Mohol |
| Date | : | 30/06/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer | : | 30/06/2026 |
| Judgment Uploaded on | : | 30/06/2026 |